# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31/07/2023 (सोमवार) दुपार

## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०५ कि.मी अंतरावरील आय टी आय सावनेरचे गेट समोर सावनेर येथे दिनांक २९/०७/२०२३ चे २१.३० वा. ते दिनांक २९/०७/२०२३ चे २२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— अंकित अरुन कडू, वय २६ वर्ष, रा. आदासा ता. कळमेश्वर ह. मु बसवार ले आउट सावनेर हे **आरोपी नामे— १) १) महादेव पुरे २) सुरेश मोतीराम बिलवार ३) विनोद बंबुरे सर्व रा. पहिलेपार सावनेर** यांना चांगल्या प्रकारे ओळखत असून आरोपी क्र. १) याचेसोबत एक महिन्या पुर्वी आरोपी क्र. १ याने केलेल्या अपघाताचे कारणावरून आरोपी क्र. १ याचे सोबत फिर्यादीचा वादविवाद झाला होता. फिर्यादी हा झोपण्याकरिता हार्ड वेअरच्या दुकानात आय. टी. आयच्या रस्त्याने मोटरसायकलने दुकानाकडे जात असता तेथे आरोपी क्र. १), २), ३) हे उभे दिसले व त्यांनी फिर्यादीचे गाडीसमोर येवून फिर्यादीस थांबविले व आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे उजव्या गालावर भुक्की मारुन खाली पाडले व केस धरुन उभे केले व आरोपी क्र. २ व ३ यांनी फिर्यादीस पकडुन ठेवले त्याच वेळी आरोपी क्र. १ याने खिशातील चाकु काढुन फिर्यादीचे गळयावर फिरविला डाव्या कुशीवर, हनवटीला, छातीवर चाकुचे वार केले त्यामुळे फिर्यादी जागेवर रक्तबंबाळ झाला व फिर्यादी स्वत:च धावपळ करुन गाडीला किक मारुन सरकारी दवाखान्यात सावेनर येथे गेला व नंतर त्याला नागपुर येथे रेफर केले. यातील आरोपी क्र. १, २, ३ यांनी संगणमत करुन फिर्यादीचे मोटरसायकल अडवुन चाकुने मारहाण करुन जखमी करुन जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०७, ३४१, ३४ भादवी. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपी क्र. २) याला अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक शरद भस्मे मो. नं. ९७६४९४६८०८ हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ०३ किमी अंतरावरील टी पॉईंट परिसर चनकापूर येथे दिनांक ३०/०७/२०२३ चे ०४/४५ वा. ते ०५/०० वा. सुमारास यातील अज्ञात आरोपीतांनी संगनमत करून टी पॉइंट परिसरातील १० लोखंडी रॉड प्रत्येकी १० फुटाचे एकूण किंमती १०,०००/— रुपये एक चनल १० फूट किंमती अंदाजे १५००/— रू. २ ॲलर रोलर किंमती अंदाजे १०००/— रू. असा एकूण १२५००/— रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार पवार पोस्टे खापरखेडा मो. नं. ९८८११४३९२७ हे करीत आहे.

# चोरी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत १५ किमी अंतरावरील मौजा नेरला शिवार येथे दिनांक २९/०७/२०२३ ते दिनांक ३०/०७/२०२३ चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे— बापुराव नारायण पडोळे, वय ५५ वर्ष, रा. नेरला ता. मौदा याचे शेतातील व फिर्यादीचे लगतचे तिन शेतकऱ्याचे शेतातील एकुण ४८ बॅग खत (सल्फेट) किंमती अंदाजे ४१,३३०/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

चोरी गेलेला मुद्देमाल :— १) सुपर नावाचे खताचे बॅग ०७ प्रत्येकी ५५०/— रू. प्रमाणे एकुण किंमती अंदाजे ३,८५०/— रू २) २०.२०.०.१३ चे ०५ बॅग प्रत्येकी १२००/— रू प्रमाणे किंमती अंदाजे ६०००/— रू ३) युरीया ०३ बॅग प्रत्येकी २६६ रू प्रमाणे किंमती ७९८ रू एकुण १५ बॅग खत किंमती १०,६४८/— रू. तसेच नामदेव पडोळे याचे शेतातुन १) डि. ए पी ०५ बॅग प्रत्येकी १३००/— रू. प्रमाणे ६,५००/— रू २) २०.२०.०.१३ चे ०३ बॅग प्रत्येकी १२००/— रू प्रमाणे किंमती अंदाजे ३,६००/— रू. ३) युरीया ०३ बॅग प्रत्येकी २९०/— रू प्रमाणे किंमती अंदाजे ८७०/— रू ४) पोटॅश ०१ बॅग किंमती अंदाजे ८००/— रू एकुण १२ बॅग खत किंमती अंदाजे ११,७७०/— रू. यादव लोणकर याचे शेतातील १) डि ए पी ०३ बॅग प्रत्येकी १३५०/— रू प्रमाणे ४,०५०/— रू २) १५.१५.१५ नावाचे ०३ बॅग प्रत्येकी १३००/— रू प्रमाणे किंमती अंदाजे ३,९००/— रू ३) सुपर खत नावाचे ०२ बॅग प्रत्येकी ५००/— रू प्रमाणे किंमती अंदाजे १,०००/— रू. एकुण ८ बॅग खत किंमती अंदाजे ८,९५०/— रू. भालचंद्र लोणकर याचे शेतातुन १) १०.२६.२६ नावाचे ०३ बॅग प्रत्येकी १४००/— रू प्रमाणे ४,२००/— रू २) डि ए पी ०३ बॅग प्रत्येकी १३००/— रू प्रमाणे ३,९००/— रू ३) युरीया ०७ बॅग प्रत्येकी २६६/— रू प्रमाणे किंमती अंदाजे १८६२/— रू एकुण १३ बॅग खत किंमती अंदाजे ९,९६२/— रूपयाचा मुद्देमाल असा एकुण ४८ बॅग किंमती अंदाजे ४१,३३०/— रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार माहुरे ब. नं. ९६१ मो. नं. हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**